| MHSO200011722025 | **नियमीत दिवाणी दावा नं. २२५/२०२५**<br>(दशरथ लेंडवे वि. शिवाजी लेंडवे वगैरे) |
|---|---|

## निशाणी क्र. २३ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फाचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द सरस निरस मानाने वाटपाचा, डिक्लेरेशन व निरंतर ताकीदीसाठी दावा दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी नं.२ हे मजुरीनिमित्त परगावी असल्याने व मुदतीच्या आत वेळेत कागदपत्रे मिळाली नसल्यामुळे मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द दि.२१/०८/२०२५ रोजी एकतर्फा आदेश पारित झालेला आहे. सदर केसचे कामकाज ऑन मेरिट चालण्यासाठी व नैसर्गिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने सदरचा आदेश रद्द होऊन मिळणे आवश्यक आहे. सदरचा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला एकतर्फाचा हुकूम रद्द होऊन मिळण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, अर्जातील मजकूर खरा नसून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. तसेच, अर्ज मंजूर करणेचे झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी.

४. प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द सरस निरस मानाने वाटपाचा, डिक्लेरेशन व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी मुदतीत कैफियत दिलेली नाही. त्यांच्याविरुध्द एकतर्फाचा आदेश पारित झाल्याचे दिसून येते. प्रतिवादीने विलंबाबाबत अर्जात नमूद असलेले कारण संयुक्तिक

वाटत नाही. विलंबाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतु, सदर दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणांगुणावर होण्यासाठी आवश्यक आहे. तरी सदरचा दावा स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेख सदरी असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर करणेसाठी अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि.२४ खाली शपथपत्र दाखल केले आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. सबब, त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करणे व त्यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि.२३ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना नि.क्र.२३ वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर कैफियत दाखल करणेस परवानगी देण्यात येते.

PATIL ARTEE ASHOKRAO Digitally signed by PATIL ARTEE ASHOKRAO Date: 2026.03.13 15:39:17 +0530

(**श्रीमती ए.ए.पाटील**)

दि. १३/०३/२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

सांगोला, जि. सोलापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | :- | Smt. S.S.Kolekar |
| (b) | Court | :- | Smt. A.A.Patil<br>Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| (c) | Judgment/Order signed by PO on | :- | 13/03/2026 |
| (d) | Judgment/Order uploaded on | :- | 13/03/2026 |